# GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD

इयत्ता -१० वी-अ, ब, क PRELIMINARY EXAMINATION मार्क – ८०

दिनांक -०७ /०१/२०२५ विषय - मराठी वेळ-2 ½ तास

**INSTRUCTIONS- 1. This paper comprises of two sections. Section A and section B.**

**2. Section A &Section B Answersmust be written on the answer sheet.**

## विभाग- "अ"

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

निरंजन आज भल्या पहाटेस उठून अभ्यासाला बसला होता. आज शेवटचा नागरिकशास्त्राचा पेपर तो झाला, संपलीच परीक्षा. इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र, तिन्ही विषयांचा केवढा अभ्यास करावा लागतो. त्यात नागरिकशास्त्र जरा अवघडच.

पहाटेची, सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते, हा भडसावळे गुरुजींनी दिलेला सल्ला अगदी योग्य होता . सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो. शरीरही पुरेशा विश्रांतीमुळे ताजेतवाने बनलेले असतं. प्रसन्न वातावरणामुळे मनही अभ्यासात चटकन लागू शकते. हवेत सुखद गारवा असतो. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असते ते नसेल तर पक्ष्यांच सुमधुर संगीत साथीला असतंच .आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा एखादा श्लोक चटकन पाठ होतो. एरवी न कळलेलं गणित चटकन कळतं.त्याची रीतही लक्षात राहते, हा निरजनचा अनुभव त्यामुळेच भडसावळे गुरुजींचा हा सल्ला त्याला मोलाचा वाटे.

निरंजनची गुरुजींवर अपार श्रद्धा होती तसं गुरुजींचही निरंजनवरही खूप प्रेम होतं. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा आणि अभ्यासही. या जगात त्याचं असं कुणी नव्हतंच दूरदूर नात्यातल्या एका मावशीच्या घरी चिपळूण शहरालगतच्या एका उपनगरात तो राहायचा गावापासून दूर डोंगरा पायथ्याशी हे मावशीचं घर होतं. आईवडील लहानपणीच वारले. काही दिवस मामाने सांभाळ केला आणि मग कामासाठी म्हणून चिपळूणला आणलं. या मावशीकडे आणून सोडलं आणि तोही मुंबईला निघून गेला तो कायमचाच. जाताना मोलाचा सल्ला मात्र देऊन गेला 'रडत बसू नको शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. मावशी देईल ते खा आणि इथंच रहा. मावशी तुला शाळेतही घालणार आहे.

मामा गेला तो पुन्हा परतला नाही मात्र लहानसा निरंजन मावशीच्या घरी प्रामाणिकपणे काम करायचा. घरात सर्वांशी त्याने जमवून घेतलं आणि शाळेत नाव दाखल केलं. मावशीची परिस्थिती यथातथाच असल्याने निरंजन वार लावून जेवायचा. पहिल्याच वर्षी त्याची अभ्यासातली प्रगती पाहून भडसावळे गुरुजींनी त्याला थोरामोठ्यांच्या घरी वार लावून दिले. दररोज एकाच्या घरी दुपारी

निरजन पाहुणा म्हणून जेवायला जायचा, मग तिथून शाळेत. सध्याकाळी मात्र मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा. सकाळी लवकर उठून घरातली, गोठ्यातली सारी कामे आटपून अभ्यासाला बसायचा. गुरुजींवर श्रद्धा ठेवायचा आणि परीक्षेत पहिला नंबर पटकवायचा. त्याच्या वह्या-पुस्तकाचा खर्च भडसावळे गुरुजीच करायचे. गुरुजींनी त्याला सांगितलं, की 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.' गुरुजींचं हे वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा.

आज नागरिकशास्त्राचा अभ्यास करत असताना आधीचे सगळे पेपर्स चांगले गेले असल्याने तो मनोमन खुश होता. नागरिकांची कर्तव्ये कोणती? उत्तम नागरिक कुणाला म्हणावे? लोकसभा म्हणजे काय? ग्रामपंचायतीचा प्रमुख कोण असतो? साऱ्या प्रश्नांची उत्तरे त्याला धडाधड येत होती. अभ्यास करता करता किती वेळ लोटला कुणास ठाऊक. निरंजन ताडकन उठून उभा राहिला. नऊ वाजून गेले होते. साडेदहाची परीक्षा. त्याआधी देशमुखाकडे जायचं होतं. केवढंतरी लांब चालायचं होतं. भराभर आवरून तो निघाला.

**कृती १ : खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा:** **गुण ४**

१. निरंजन भडसावळे गुरुजींचा लाडका विध्यार्थी का होता ?

२. निरंजन वार लावून का जेवायचा ?

३. गुरुजींचं कोणते वाक्य लक्षात ठेवून निरंजन झटून अभ्यास करायचा?

४. निरंजनचा शेवटचा कोणता पेपर राहिलेला होता?

**कृती २: रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण २**

१. आल्हाददायक वातावरणात .................................... एखादा श्लोक चटकन पाठ होतो.

२. निरंजनची .................................... अपार श्रद्धा होती.

३. दररोज एकाच्या घरी दुपारी निरजन .................................... म्हणून जेवायला जायचा.

४. .................................... , सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असते.

**कृती ३ : कोण कोणास म्हणाले ते लिहा :** **गुण २**

१. 'रडत बसू नको शेण, गोठा वगैरे जी पडतील ती सारी कामं कर.'

२. 'जोपर्यंत तुझा पहिला नंबर आहे, तोपर्यंतच मी सारा खर्च करीन आणि वारही लावून देईन. नाहीतर नाही.'

**कृती ४: खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार वाक्यात लिहा:** **गुण ४**

१. भडसावळे गुरुजींच्या मते अभ्यासासाठी सकाळची वेळ योग्य का असते ?

२. निरंजनला कोणकोणत्या प्रश्नांची उत्तरे पाठ होती ?

**प्रश्न २. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : ( कोणतेही ६ )** **गुण ६**

१. लेखक चंदू बोर्डे यांचा लहानपणीचा स्वभाव कसा होता ?

२. 'तू बुद्धी दे' या कवितेत कवीने कशाचे महत्व सांगितले आहे?

३. उर्जाशक्तीचा जागर या पाठाचे लेखक कोण आहेत ?

४. लेखक चंदू बोर्डे यांनी कोणत्या सामन्यात १०० धावा केल्या होत्या ?

५. खरा नागरिक या पाठाचे लेखक कोण आहेत?

६. कवी गुरु ठाकूर आजन्म कशाचा ध्यास मागत आहे?

७. लेखक चंदू बोर्डे यांचा लहानपणीचा स्वभाव कसा होता ?

८. निरंजनला लोकांच्या कोणत्या प्रवृत्तीचा राग येई ?

**प्रश्न ३. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:** **गुण ८**

१. त्यांच्यामुळे मला--------------------------- शाळेत प्रवेश मिळू शकला.
(माध्यमिक, प्राथमिक, नर्सरी)

२. माझे वडील त्या वेळेस ---------------------------- तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते.
(पोलीस खात्यामध्ये, शिक्षण खात्यामध्ये, जल खात्यामध्ये )

३. दुसऱ्या दिवशीच्या ---------------------------- निरंजनची स्तुती फोटोसकट छापून आली होती.
( मासिकात, जाहिरात, वर्तमानपत्रात )

४. ---------------------- साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. (१८४५,१९४५, १७४५ )

५. एवढा मोठा अपघात त्याच्या ---------------------------- टळला म्हणून निरंजनचे कौतुक झाले.
(चाणाक्षपणामुळे, हुशारीमुळे, चतुराईमुळे )

६. नंतर माझ्या वडिलांची बदली---------------------------- झाली.
( गिरगावला, मालेगावला, वडगावला )

७. माझा जन्म ............ एका गरीब कुटुंबात झाला.

( पुण्यातच, मुंबईतच, नागपूर )

८. आमच्या शाळेत दर शनिवारी ............ परीक्षा घेण्यात येत असे.

( सहामाही, वार्षिक, चाचणी )

**प्रश्न ४. ( अ) खालील वाक्प्रचारांचे अर्थ लिहा : गुण ४**

( मायेची सावली नसणे, विनंती करणे, त्रिफळा उडवणे, खूप गर्दी असणे, कारस्थान रचणे, प्राण गमावणे, प्रसिद्ध असणे, मत्सर वाटणे )

१. आर्जव करणे २. झिम्मड उडणे ३. नामांकित असणे ४. जीवाला मुकणे

५. हेवा वाटणे ६. कट रचणे ७. दांडी उडवणे ८. आभाळ हरवणे

**प्रश्न ४. ( ब) खालील दिलेल्या शब्दांचे अर्थ लिहा: गुण ४**

( भावना, दुर्घटना, कामगिरी, बातमीदार, मेहनत, कठीण, त्रासदायक, सदस्य )

१. कर्तव्य २. उपद्व्यापी ३. संवेदना ४. अपघात

५. सभासद ६. वार्ताहार ७. कष्ट ८. अवघड

**प्रश्न ४. (क) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा : गुण ३**

१. निरंजन सख्ख्या मावशीकडे राहत होता.

२. लेखक चंदू बोर्डे यांच्या वडिलाचा मासिक पगार चोवीस रुपये होता.

३. निरंजनच्या मावशीची परिस्थिती श्रीमंतीची होती.

**प्रश्न ४.(ड) खालील शब्दामधून अचूक शब्द ओळखा : गुण ३**

१. नवचेतना, नवचेअतना, नवचचेताना : ............

२. स्वभाव, स्वभ्हाव, स्वभ्हाव: ............

३. साहवास , सहअवास, सहवास : ............

४. संमार्ग, सनमार्ग, सन्मार्ग : ............

५. ऑस्ट्रेलियान, ऑस्ट्रेलियन, ऑस्त्रेलीयाआन : ............

६. उर्जाआशक्ती, ऊर्जाशक्ती, उर्जाश्यति : ............

## विभाग (ब)

**प्रश्न ५. (अ) खालील दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून दिलेली वाक्ये पुन्हा लिहा.** **गुण ४**

१. काझीरंगा अभयारण्यात अनेक वन्य प्राणी आहेत.

२. नदीकिनारी सुंदर असे गाव वसलेले आहे.

३. वाघाची दृष्टी खूप तेज असते.

४. सकाळी आकाश खूप निरभ्र होते.

**प्रश्न ५. (ब) खालील दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून दिलेली वाक्ये पुन्हा लिहा .** **गुण ४**

१. सचिनने केलेल्या कामाचे त्याला समाधान झाले.

२. वेदांत दररोज सकाळी व्यायाम करतो.

३. माणसाचा जन्म निसर्गनियमानुसार ठरलेला असतो.

४. पूर्वेचा वारा अगदी जोरात वाहत होता.

**प्रश्न ५. (क) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा :** **गुण ४**

**(नीलकंठ, धनवान, सावकार, गृहिणी, जमीनदार, पुष्पगुच्छ, दानशूर, खोटारडा )**

१. घरात राहणारी स्त्री २. जास्त जमीन असलेला ३. जास्त संपत्ती असलेला ४. पैसे कर्जाऊ देणारा

५. खोटे बोलणारा ६. दान करणारा ७. फुलांचा एकत्रित गुच्छ ८. कंठ निळा असलेला

**प्रश्न ६. (अ) खालील वाक्यातील काळ ओळखा :** **गुण २**

**( वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ )**

१. शिक्षकांनी धडा शिकविला.

२. सीता पुस्तक वाचते.

**प्रश्न ६. (ब) खालील दिलेल्या वाक्यांचे प्रकार ओळखा :** **गुण २**

**( विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, उदगारार्थी )**

१. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

२. अरेरे ! फारच वाईट झाले.

**प्रश्न ७. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा .** **गुण ६**

१. तुमच्या शाळेत उन्हाळी सुट्टीत( in summer vacation ) **'हस्ताक्षर सुंदर करूया !'** (for good handwriting) हे दहा दिवसाचे शिबिर (ten days workshop) आयोजित केले आहे . त्यात तुम्हाला सहभागी (To participate) करून घेण्याची विनंती (request) करणारे पत्र तुमच्या वर्गशिक्षकांना ( to the class teacher) लिहा.

किंवा (or)

२. तुमच्या मित्राला / मैत्रिणीला वक्तृत्व स्पर्धेत (elocution competition) प्रथम क्रमांक (first prize) मिळाल्याबद्दल अभिनंदन (congratulation) करणारे पत्र लिहा :

**प्रश्न ८. खालील उतारा वाचून त्याखालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:**

## कोरोना काळातले देवदूत

वर्ष 2020 संपूर्ण मानवजातीसाठी खूपच आव्हानात्मक ठरलं. चीनच्या वुहान नामक शहरातून आलेल्या एका साध्या डोळ्यांनी न दिसू शकणाऱ्या व्हायरसने हा हा म्हणता संपूर्ण जगाला दहशतीच्या छायेखाली आणलं. सुरुवातीला चीन देशाच्या एका शहरातल्या छोट्याशा बाजारपेठेत सापडलेला हा विषाणू आपल्यापर्यंत पोहोचेलच कसा? असा फाजिल विचार करणाऱ्या माणसांनादेखील या विषाणूने 'दे माय धरणी ठाय' करुन सोडलं.

प्रचंड वेगानं संसर्ग होणाऱ्या या विषाणूचं खरं रुप आणि त्यावर उपाययोजना शोधणे ही गोष्ट सुरुवातीला अशक्यप्राय वाटत होती. त्यामुळे जवळपास सर्वच देशांनी यावर 'लॉकडाऊन 'ची मात्रा वापरली. बघता बघता संपूर्ण जग एका विचित्र घरकोंडीत अडकलं. स्वतःच्या कर्तृत्वावर अनाठायी विश्वास असणाऱ्या माणसाला या यः कश्चित विषाणूने चार भिंतीत कोंडलं. फक्त अत्यावश्यक सेवा वगळता बाकी सर्व व्यवसाय, शाळा व आस्थापने बंद करण्यात आली. सर्वत्र एका अनाहूत भीतीचे वातावरण पसरले होते. जणू काही माणसालाच माणसाची भीती वाटू लागली होती.

पण अशा अनिश्चित वातावरणातही काही लोक मात्र अखंडपणे आपल्याला सेवा पुरवित होते. प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालूनही लोकांचे जीव वाचवत होते. त्यात सर्वात वरचा नंबर जर कोणाचा लागत असेल तर तो आपल्या डॉक्टर मित्रांचा. डॉक्टर्स, नर्सेस आणि हॉस्पिटलचा संपूर्ण स्टाप लोकांचे जीव वाचवण्यासाठी अक्षरशः जीवाचं रान करी होता. त्यानंतर येतात पोलीस लोकांनी कोणत्याही प्रकारचे लॉकडाऊनचे नियम तोडू नयेत, अनावश्यक गर्दी करू नये आणि त्याचबरोबर सर्वांचे दैनंदिन जीवन सुरळीत चालावे यासाठी सर्व पोलीसदल झटत होते.

लॉकडाऊन असले तरी लोकांना पोट तर भरावेच लागणार यासाठी शेतकरी, भाजीविक्रेते, किराणा दुकानदार सर्वचजण आपापले काम करीत होते. सर्वच अत्यावश्यक सेवा, प्रशासन आणि मुख्य म्हणजे आपले स्वच्छतादूत म्हणजेच सफाईकामगार देखील अहोरात्र मेहनत घेत होते. या सर्वांच्या

अखंड सेवेमुळेच आपला हा लॉकडाऊनचा काळ सुखाचा गेला आणि कोरोनाच्या संकटाचा आपण धैर्याने सामना करु शकलो. म्हणूनच या कोरोना काळातील देवदूताना आपण मनः पूर्वक धन्यवाद देऊ या. आणि पुन्हा या संकटाचा उद्रेक होऊ नये म्हणून स्वच्छता आणि सुरक्षित अंतर पाळू या. आवश्यक तेथे मुखपट्टी वापरु या. या कठीण काळाने आपल्याला खूप गोष्टी शिकवल्या त्या लक्षात ठेवू या.

**कृती १. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **गुण ४**

1) वर्ष 2020 मानवजातीसाठी कसं ठरलं ?

2) कोरोनाचा विषाणू कोणत्या शहरातून आला ?

3) सर्व देशांनी कोरोनावर मात करण्यासाठी काय उपाययोजना केली ?

4) स्वच्छतादूत कोणास म्हटले आहे ?

**कृती २ . पुढील प्रश्नाची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा :** **गुण ४**

1) कोरोनाकाळातले देवदूत कोणाकोणांस म्हटले आहे ?

२) कोणाच्या अखंड सेवेमुळे आपला लॉकडाऊनचा काळ सुखाचा गेला ?

**कृती ३ : रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण २**

१. त्यामुळे जवळपास सर्वच देशांनी यावर .................... ची मात्रा वापरली.

२. असा फाजिल विचार करणाऱ्या माणसांनादेखील या विषाणूने .................... करुन सोडलं.

३. आवश्यक तेथे .................... वापरु या.

४. जणू काही माणसालाच .................... भीती वाटू लागली होती.

**प्रश्न ९. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा: (any 1 )** **गुण ८**

१. माझा मित्र / मैत्रीण

मुद्दे: ( मैत्री कधी झाली – मित्राचे नाव – मित्राचे वर्णन – गुण आणि दोष – माझा /माझी मित्र चांगला / चांगली का? – मित्राचा / मैत्रिणीचा स्वभाव )

२. माझा आवडता खेळ

मुद्दे : ( खेळ कसा खेळतात – खेळातून आनंद कसा मिळतो – माझा आवडता खेळ कोणता ? – तो खेळ का आवडतो - खेळामुळे आपली प्रगती कशी होते? मन प्रसन्न होते – उत्साह मिळतो - तुमचे प्रेरणास्थान कोण आहेत.)

३. एका सैनिकाचे आत्मवृत्त

मुद्दे: ( बालपण – शिक्षण – परंपरा शौर्याची - अभिमान - सैन्यात प्रवेश - सैन्यातील अनुभव प्रेरणा – लढाई – संघर्ष )